# जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.

जा.क्र.२०२१/आ.व्य./को.वि.CCC/कावी- ६८१

दि.०१.०६.२०२१

**विषयः- CCC स्थापन करण्यासाठी इमारत अधिगृहित करणे बाबत.**

**वाचा- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ६५ नुसार.**

**२. साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ नुसार.**

**आदेश**

ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७, दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३, ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हिड-१९) नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी शासन व जिल्हास्तरावरून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. परंतु हिंगोली जिल्ह्यात कोरोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी मौजे.हट्टा ता.वसमत येथील सौ.शांताबाई वेदप्रकाश पाटील आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र (रुग्णालयातील बेड क्षमता १००) आणि सौ.शांताबाई वेदप्रकाश पाटील होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र (रुग्णालयातील बेड क्षमता २५) या दोन महाविद्यालयातील रुग्णालयात CCC स्थापन करण्याकरीता सदर इमारत अधिगृहित करणे बाबत माझे मत झाले आहे.

त्याअर्थी, मी रुचेश जयवंशी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली मला प्राप्त अधिकारानुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वसमत तालुक्यातील मौजे.हट्टा येथे CCC स्थापन करण्याकरिता खालीलप्रमाणे आदेशित करीत आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | इमारतीचे नाव व पत्ता | हेतू |
|---|---|---|---|
| १. | मौजे.हट्टा ता.वसमत जि.हिंगोली | सौ.शांताबाई वेदप्रकाश पाटील आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, हट्टा ता.वसमत जि.हिंगोली | CCC करीता |
| २. | मौजे.हट्टा ता.वसमत जि.हिंगोली | सौ.शांताबाई वेदप्रकाश पाटील होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र, हट्टा ता.वसमत जि.हिंगोली | CCC करीता |

त्यानुसार वरीलप्रमाणे अधिगृहित करण्यात आलेल्या CCC स्थापन करण्याच्या अनुषंगाने संबंधीतानी योग्य ती कार्यवाही करावी. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली, पोलीस अधीक्षक, हिंगोली, उपविभागीय अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. हिंगोली तहसीलदार, मुख्याधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची असेल.

त्यानुसार वरीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत असून सदर आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येऊन संबंधीतावर आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, साथ रोग प्रतिबंध कायदा १८९७ यानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(रुचेश जयवंशी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

**प्रतिलिपी:**

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
४. सर्व उपविभागीय अधिकारी, जि.हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
५. जिल्हा शल्यचिकित्सक, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
७. सर्व तहसीलदार, जि.हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
८. सर्व मुख्याधिकारी, न.प.-न.पं., जि.हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
९. प्राचार्य. सौ.शांतादेवी वेदप्रकाश पाटील आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र मौ.हट्टा ता.वसमत जि.हिंगोली यांना माहितीस्तव.
१०. प्राचार्य. सौ.शांतादेवी वेदप्रकाश पाटील होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र मौ.हट्टा ता.वसमत जि.हिंगोली यांना माहितीस्तव.
११. संबंधित अधिकारी यांना अनुपालनास्तव.

(रुचेश जयवंशी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

# जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.

(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.)

**तात्काळ/महत्वाचे**

जा.क्र.२०२०/आ.व्य./को.वि.CCC/कावी- **३८४**

दि.१८.०८.२०२०

**विषय: CCC स्थापन करण्यासाठी इमारत अधिगृहित करणे बाबत.**

**वाचा: १.आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ६५ नुसार.**

**२.साथ रोग प्रतिबंध कायदा १८९७ नुसार.**

**३.फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३**

**४.या कार्यालयाचे या विषयाचे आदेश क्र.२०२०/आ.व्य./कोरोना:CCC,DCHC,CH/कावी-२४६ दि.२१.०५.२०२०.**

**<u>आदेश</u>**

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हीड १९) नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी हिंगोली जिल्ह्यात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने अशा रुग्णांवर उपचार करण्यासाठी जिल्ह्यात Covid Care Centre स्थापन करण्याकरिता Covid Care Centre साठी सोयीस्कर अशा जिल्ह्यातील इमारती अधिगृहित करणे बाबत निर्णय झाला आहे.

त्याअर्थी मी रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली मला प्राप्त अधिकारा नुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता उपाययोजना करण्यासाठी मौ.हट्टा, ता.वसमत येथील सौ.शांतादेवी वेदप्रकाश पाटील आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र (रुग्णालयातील बेड क्षमता १००) आणि सौ.शांतादेवी वेदप्रकाश पाटील होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र (रुग्णालयातील बेड क्षमता २५) या दोन महाविद्यालयातील रुग्णालयात Covid Care Centre स्थापन करण्यासाठी सदर महाविद्यालयाच्या रुग्णालयाची इमारत अधिगृहित करण्याकरिता आदेश निर्गमित करीत आहे.

त्यानुसार वरीलप्रमाणे अधिगृहित करण्यात आलेल्या वरीलप्रमाणे दोन्ही Covid Care Centre मध्ये या कार्यालयाचे संदर्भ क्र.४ च्या आदेश नुसार संबंधीतांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली, पोलीस अधीक्षक हिंगोली, उपविभागीय अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प., तहसीलदार, मुख्याधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व इतर संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांची असेल.

त्यानुसार वरीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत असून सदर आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येऊन संबंधीतावर आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, साथ रोग प्रतिबंध कायदा १८९७ यानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत

**(रुचेश जयवंशी, भा.प्र.से.)**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

**प्रतिलिपी:**

१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
४. उपविभागीय अधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
५. जिल्हा शल्यचिकित्सक, हिंगोली यांना आवश्यक त्या योग्य कार्यवाहीस्तव.
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.हिंगोली यांना आवश्यक त्या योग्य कार्यवाहीस्तव.
७. तहसीलदार वसमत यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
८. मुख्याधिकारी न.प.वसमत यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
९. प्राचार्य, सौ.शांतादेवी वेदप्रकाश पाटील आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, मौ.हट्टा, ता.वसमत जि.हिंगोली. यांना माहितीस्तव.
१०. प्राचार्य, सौ.शांतादेवी वेदप्रकाश पाटील होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र, मौ.हट्टा, ता.वसमत जि.हिंगोली. यांना माहितीस्तव.

**(रुचेश जयवंशी, भा.प्र.से.)**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**